एका प्रगल्भ कवीची कविता

# 'दर्पणीचे दीप'

कवी - **शंकर रामाणी**



समीक्षक

**डॉ. अशोक कृष्णाजी जोशी**

**श्री**. शंकर रामाणी हे मराठीतील एक मोठे कवी आहेत. आधुनिक काळातल्या कवीमध्ये बा. भ. बोरकराबरोबरच त्यांचेही गोव्यातले मोठे कवी म्हणून नाव घेतले जाते. त्यांचे जन्मापासूनच सारे आयुष्य गोव्यात गेले. गोव्यातच त्यांनी नोकरी केली व इथेच ते निवृत्तही झाले. गेले पंधराएक वर्षे ते गोव्यानजीकच्या बेळगाव येथे राहात आहेत. गोव्यात असताना त्यांचा फार जवळचा संबंध श्री. पु. भागवतांशी व त्यांच्या मौज प्रकाशनाशी आला. १९९२ मध्ये मौज प्रकाशनाने त्यांचा 'दर्पणीचे दीप' हा कवितासंग्रह प्रकाशित केला. त्याला गोमंतक मराठी अकादमीचा कृष्णादास शामा पुरस्कार मिळाला व महाराष्ट्र राज्याचा राज्य पुरास्कार असे दोन पुरस्कार मिळाले. त्या आधी मौज प्रकाशनाने त्यांचे 'आभाळवाटा' (१९६७) व 'पालाण' (१९७९) असे दोन कवितासंग्रह प्रकाशित केले होते. त्याआधी तीन प्रकाशनगृहांनी त्यांचे तीन कवितासंग्रह प्रकाशित केले होते. कलाशुकेंदु या पणजीच्या संस्थेने त्यांचे 'ऊर्मिला' हे दीर्घकव्य, दत्तात्रय वामन नाईक यांनी 'सूर्यफुले' (१९४९) हा कवितासंग्रह, तर सागर साहित्य प्रकाशन, मुंबई यांनी त्यांचा 'कातरवेळ' ( १९५९) हा कवितासंग्रह असे तीन काव्यग्रंथ प्रकाशित केले होते.

आता 'गर्भागार' हा नवा काव्यसंग्रह इ. स. २००० मध्ये 'मौज' ने प्रकाशित केला आहे. या काव्यग्रंथांवरून रामाणींची कवी म्हणून ओळख आपल्याला होतेच. शिवाय कवितेवरील त्यांची निष्ठापूर्ण भक्तीही स्पष्ट होते. पन्नास वर्षाहून अधिक काळ ते कविता लिहीत व दुसऱ्या कवींच्या चांगल्या कविता वाचीत राहिले. अशी काव्यनिष्ठा दुर्मिळच. रामाणींचे हे वैशिष्ट्य इथे नोंदवणे आवश्यक वाटते.

रामाणींचा दर्पणींचे दीप हा कवितासंग्रह एका प्रगल्भ कवीचा ग्रंथ आहे. प्रगल्भतेच्या खुणा यातील कवितांच्या आशयात व शब्दरचनेत ठायी ठायी आढळतात.

संतकवींचा रामाणींच्या कवितांवर प्रभाव आहे. संत तुकाराम, रामदास व एकनाथ या तीन संत कवींचा मोठाच परिणाम त्यांच्या कवितेचा आशय व शब्दकळा यांवर आहे. शिवाय ज्ञानेश्वरांचाही त्यांच्या कवितेवर प्रभाव आहे. संत तुकारामांच्या अभंगांचा, त्यांच्या कवितेच्या शब्दरचनेवर वा शब्दकळेवर प्रभाव आहे, तर संत रामदासांमुळे त्यांच्या मनावरील कविता प्रभावित झाल्या आहेत. कोड्यासारख्या वाटणाऱ्या त्यांच्या कांही कविता संत एकनाथांमुळे घडल्या आहेत. अभंगाप्रमाणेच ओवी या छंदावरही रामाणींचे प्रभुत्व आहे. त्यांनी लहानपणी ओव्या ऐकल्या व पुढे ओव्या जाणीवपूर्वक वाचल्याही. या सर्वांचा प्रभाव त्यांच्या काही कवितांवर पडला आहे. आधुनिक काळाचा विचार करता कविश्रेष्ठ बा. सी मर्ढेकर व पु. शि. रेगे या दोन कवींचा त्यांच्या कवितेवर परिणाम झाला आहे. मर्ढेकरानी आधुनिक कविता घडवली. नव्या व जुन्याची सांगड घालत असतानाच आशय व शब्दरचना यांबाबतीत समकालीन व आधुनिक राहायचे हे मर्ढेकरांच्या कवितेतून शिकायला मिळते. तर पु. शि रेगे यांच्या कविता मुख्यतः शारीरप्रेमाच्या असल्या तरी त्या अध्यात्मिकही आहेत. एकाच वेळी शारीरप्रेम व अध्यात्म या दोन पातळ्यांवर कसे राहायचे हे रामाणी पु. शि. रेगे यांच्या कवितेपासून शिकले. हे सर्व प्रभाव पचवून रामाणींची कविता प्रगल्भ झाली आहे.

रामाणीना मुक्तछंद येतो. आधुनिक कवितेचा मुख्य छंद मुक्तछंद आहे. तरी त्यांना छंदात्मक कविता लिहायला आवडते. ओवी व अभंग या दोन छंदावर त्यांचे प्रभुत्व असल्याचे आपण आधीच पाहिले आहे. छंदात्मकता व मुक्तछंद यांचे मिश्रण असणारी कविता त्यांनी लिहिली.

रामाणीनी विविध विषय आपल्या कवितांतून हाताळले, तरी त्यांचे आवडीचे म्हणून काही विषय आहेत. त्यांमध्ये वेगवेगळे कवी व कलाकार जसे येतात, त्याप्रमाणे एकाकीपणा, निवृत्तीचा विचार, प्रेम, भक्ती, प्रकाश, अंधार, आनंद, दुःख, झाडे, दिवसरात्रीच्या विविध वेळा, ऋतु, जन्म, माहेर व आई असेही विषय येतात.

कवीच्या अनुभवांशी या साऱ्या कविता जोडलेल्या आहेत. रामाणी जरी बाहय (पक्षी, झाड इत्यादि) गोष्टींवर लिहीत असले, तरी त्या गोष्टींचा कविमनावर काय परिणाम होतो हे सांगण्यात त्यांना रस आहे. त्यांच्या कविता अंतर्मुखी असून आपल्या मनाचा आतला प्रवासी स्पष्ट करणाऱ्या आहेत. त्या बहिर्मुखी, वर्णनवर नाहीत. स्व-बाहेरचा प्रवास (voyage without) वर्णन करणाऱ्या त्या नाहीत.



त्यांच्या कवितेसंबंधी काही सर्वसाधारण स्वरूपाचे लिहिण्यापेक्षा त्या नेमक्या कशा आहेत हे 'दर्पणीचे दीप' या कवितासंग्रहातल्या काही कविता निवडून पाहू.

प्रथम कवी, साहित्यिक व कलाकारांवरील त्यांनी लिहिलेल्या काही कवितांतील काही भाग पाहू.

'कवी' (पा. २७) या कवितेत कवीला जगण्यासाठी टायपिस्ट किंवा टंकलेखक म्हणून काम करावे लागते असे दाखवले आहे. ते काम करीत असतानाही तो कल्पनेच्या जगात वावरतो. वास्तव मात्र वेगळेच असते. 'साहेबाचे मुर्दाड मुस्काट नवलकथेतल्या विराट राक्षसासारखे' त्याच्याकडे पाहात असते.

'केशवसुत (पा. ४२) या कवितेत रामाणींनी केशवसुतांची काव्यवैशिष्ट्ये सांगितली असून, जगासंबधीचे केशवसुतांचे मत त्यांचेच उत्कट कडवे उद्धृत करून सांगितले आहे :

'भिकार या जगीं
इप्सित न मिळे कांही
म्हणूनी तुझे पायी
भिक्षांदेही'.

बाकीबाब बोरकरांविषयी रामाणीना कौतुक आहे. उत्तम कवी व गोव्याचे कवी म्हणून बाकीबाबांचे कौतुक करीत असताना ते म्हणतात, की बाकीबाब जरी बऱ्याच प्रकारच्या कविता करीत असले तरी, ते मुख्यतः प्रेमकवी आहेत. भक्तिमार्ग व निवृत्ती- मार्ग हे त्यांचे मार्ग नाहीत. म्हणून '८ जुलै, १९९१' या कवितेत ते म्हणतात:

'बाकीबाब,
तुमचा पिंड प्रतिभासंपन्न प्रेमकवीचा,
आणि तुम्हीच म्हटल्याप्रमाणे रसलंपटही ---' ( पा. ४९), म्हणून 'जपानी रमलाची रात' लिहिणारे बोरकर त्यांना खरे बाकीबाब वाटतात.

कवितेवरच्या दुसऱ्या एका कवितेत ते सांगतात, की कविता त्यांना अचानक समजते,

'आणि माझ्या आरक्त अर्थाचे क्षितिज
तुझ्या दळदार डोळयांत पेटत गेले ......' (पा. २१)

कविता वाचल्यावर प्रगल्भ अशा आयुष्यक्षणी स्वतःच्या अस्तित्वाविषयीच काही प्रश्न उभे राहातात :

'या अनोळखी पहाटे
मी मला ओळखेन का?' ( पा. २३)

कवितेवरील त्यांची आणखी एक सुंदर कविता 'कविता स्वप्नातील झाडांच्या'

एका चित्रदृश्याचे वर्णन करताना म्हणते:

'सलीलसुंदर
सुवर्णी पंख पालवीत
आकाशात
झाडे उडून गेली..
अचानक
माझ्यातच खोलवर रूजून
विनम्र
वासंतिक झाडे
मातीतून आली .....' (पा. ३३)

'वासंतिक झाडे' हे बाह्यदृश्याचे वर्णन नसून कवीच्या मनातील भावाचे वर्णन आहे.

'पेन्शनर' ( पा. २८) व 'निखळ प्रकाशाच्या प्रवाहात' (पा. २९) या प्रासंगिक (टॉपिकल) व आत्मचरित्रात्मक कविता असल्या, तरी त्या दोन्हीचा रोख कविमनावरच आहे. 'सांज' (पा. ११) ही या संग्रहातील कविता संध्याकाळचे वर्णन करणारी असली, तरी तीमधून कविमनाचे भाव व त्याची निवृत्तीकडची ओढ दिसते.

'देहात सांज सजली, माझा तुटेल पान्हा
अजुनी न जाग आली पैलाडच्या दिव्यांना'. (पा. ११)

'आषाढले नभ' ही कविता विविध ऋतूंचा कवीवरील भावनिक परिणाम हा विषय हाताळते.

'पांघुरली दाट अवस - गोधडी
पौष - हुडहुडी साहवेना
सोसण्याच्या पार शिशिराची धग
आत तगमग वैशाखाची
विचित्र व्यथेचा गर्भारला गर्भ
आषाढले नभ नोळखीचे' (पा. ४६)

ग्रीष्माच्या उन्हाळ्यानंतर आषाढ हा पावसाळी महिना येतो. रामाणींच्या बऱ्याच कविता या आषाढावर व त्यातील सृजनावर आहेत. त्या सृजनाचे त्यांना कौतुक आहे-

'किती भाजला उन्हाळा
उष्ण अर्थाचे उमाळे,
विश्व निराळे पोसून
आता आषाढ कोसळे ...' (पा. ७०)



'मर्म' या आपल्या सुंदर कवितेत रामाणी आपल्या पुण्याईला पांगुळ पुण्याई' म्हणतात व आयुष्याला चुलीची उपमा देतात -

'माझी पांगुळ पुण्याई: चार भिंतीचे घर्कुल
आंत मांडियेली चूल आयुष्याची' ( पा. ५९)

अशा संसारात त्यांना अवचित तेजब्रह्माचे मर्म कळते -

'श्वासाश्वासात कोवळे शेज क्ररी तेजब्रह्म;
राती उजेडाचे मर्म आकळले.' (पा. ५९)

अंधार, उजेड, मोर, बीज, गर्भारपणा, जन्म, माहेर, नभ, केळपान, एकाकीपणा, अर्थशून्यता, सावल्या, पाप, वेड इत्यादि शब्द व प्रतिमा रामाणींच्या कवितांत वारंवार येतात. हे शब्द व या प्रतिमा त्यांच्या अनुभवाचाच भाग झाल्या आहेत.

अनवट शब्दकळेमुळे काही वेळा त्यांची कविता अवघड वाटते. वास्तविक साधी शब्दरचना हे कोणत्याही कवीचे सामर्थ्य आहे. रामाणीही जेव्हा कवितेत साधी शब्दरचना करतात, तेव्हा ती अधिक परिणामकारक वाटते. उदाहरणार्थ, आईवरील त्यांच्या दोन कविता त्यांच्यातील साध्या शब्दरचनेमुळे त्यांच्या कवितात उठून दिसतात. नव्वदी ओलांडलेली आई गेली, हे वास्तव मांडताना त्यांनी आई आकाश झाली आहे हे सांगितले व आई मधुर माती झाली आहे हे साध्या पण प्रभावी शब्दांत सांगितले आहे-

'माझ्या पायतळीची माती
मधुर होत चाललीय;' (पा. ९)

वृद्ध आईच्या मृत्यूने ते नुसते 'ओलावले' नाहीत, तर 'पालावले'ही आहेत.

आपण एकटे आहोत ही भावना त्यांच्या 'उजेडले उरी' या कवितेत व्यक्त झाली आहे. -

'मीच माझा साथी;
कोण उभे पुढे - पाठी?' (पा. ३८)

हा एकलेपणा निवृत्तिभावनेपर्यंत जातो व त्यांना वैराग्याची ओढ लागते -

'घाटातली विरागी ही वाट एकट्याची;
या आतल्या उजेडी, उघडी विराट दारे, --' (पा. ७९)

रामाणींच्या 'पांघरूण' (पा. १९) 'सर' (पा. १९) 'बीज' (पा. ३४) 'उजेडले उरी' (पा. ३८) 'कमळ' (पा. ६२) 'पालखी' (पा. ६३) 'मांजर' (पा. ६४) या कवितात साधी शब्दरचना असली, तरी आशयसमृद्धताही आहे. त्या कविता या दोन्ही गोष्टींमुळे उठावदार झाल्या आहेत.

रामाणींची सारी वैशिष्ट्ये त्यांच्या 'डोळ्यांनी फेडिला' या कवितेत व्यक्त झाली आहेत -

'डोळ्यांनी फेडिला
कावळा काळोख
आगळा आलोक आलिंगिला.
काळीज - कोवळे
पारवे पाऊल
वाट अळुमाळ नि:शब्दाची' (पा. १८)

'पाप' या शेवटच्या कवितेत ते संसाराला असार व अंधारमय म्हणतात. तरीही आयुष्यात कोठून तरी प्रकाश येतो व सारे आयुष्यच प्रकाशमय व देवळासारखे करतो:

'फुटू फुटू आता रंध्रांना राउळे;
पोळलेले पाप प्राणात दर्वळे --' (पा. ९०)

अंतर्मनाचे प्रभावी शब्दांद्वारा प्रकटन रामाणी आपल्या कवितांतून करतात. आपले मन, त्याच्या भावना त्यांना महत्त्वाच्या वाटतात. संतकवींशी, भारतीय अध्यात्मातील निवृत्तिमार्गाशी, मोक्षाशी आपली माळ ते जोडतात. बाह्य परिस्थितीचे वर्णन करण्यापेक्षा मनात काय घडते हे व्यक्त करण्यात त्यांना अधिक रस आहे. 'दर्पणीचे दीप' या काव्यसंग्रहात त्यांची ही वैशिष्ट्ये स्पष्ट झाली आहेत. रामाणींच्या वाटचालीतला 'दर्पणीचे दीप' हा महत्त्वाचा टप्पा आहे.

(यातील पानांचे संदर्भ 'दर्पणीचे दीप' या मौज प्रकाशनाने १९९२ साली प्रकाशित केलेल्या आवृत्तीतील आहेत.)

◆ ◆ ◆

**दर्पणीचे दीप**
कवी : शंकर रामाणी
प्रकाशक : मौज प्रकाशन गृह
खटाव वाडी - गिरगांव
मुंबई ४००००४
वर्ष : १९९२
मूल्य : ५० रु. पृष्ठे ९०

पत्ता :
**डॉ. अशोक कृष्णाजी जोशी**
प्राध्यापक व इंग्रजी विभाग प्रमुख,
गोवा विश्वविद्यालय,
ताळीगांव पठार, गोवा.